ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

# शिक्षणातील नव प्रवाह

डॉ. एम. ए. भदाणे,
अ‍ॅड. व्ही. एच. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक

**प्रास्ताविक :**

शिक्षण क्षेत्रात कालानुरूप नव नवीन संकल्पना, विचार प्रवाह व नवप्रवर्तन येत राहतात. या नवीन प्रवाहांचा व प्रवर्तनाचा परिचय शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीना होणे आवश्यक आहे. यानवीन प्रवाहात ई–लर्निंग, संगणक साहीत्य अनुदेशन, क्रमान्वित अध्ययन सहकार्ययुक्त अध्ययन, एम–अध्ययन, आंतरक्रियात्मक अध्यापन, ब्लेंडेड अध्ययन, ताप व्यवस्थापन, अध्यापनाची प्रतिमाने, वेब आधारित अध्ययन, प्रतिभास अध्ययन, तंत्रज्ञाधिकारी अध्ययन, प्रकल्प आधारित अध्ययन इत्यादी चा समावेश होतो. सदर लेखात ई–लर्निंग या नव प्रवाहाचा विचार केलेला आहे.

**ई – लर्निंग :**

Learning with the help of electronic devices is called as E-learning i.e. learning througth internet, V idco-conferncing, E-mail, chatting with the help of Te- lephony system includes E-learning

इलेक्ट्रॉनिक साधनांच्या सहाय्याने स्वतःच्या गतीने, अभिरूचीने, कुवतीने अध्ययन करणे म्हणजेच ई–लर्निंग. अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत हेतुपुरस्तरपणे माहिती तंत्रज्ञान संप्रेशणाचा वापर करणे म्हणजेच ई अध्ययन होय. ई–अध्ययनात खालील गोष्टींचा समावेश होतो.

* इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे अध्ययन
* वर्गखोल्यांचे बंधन नाही.
* २४ तास अध्ययन केंद्र
* जागतिक पातळीवरील अध्ययन
* मल्टिमिडियाद्वारे अध्ययन
* ऑनलाईन व ऑफलाईन अध्ययन
* इंटरनेट – ईमेलद्वारे अध्ययन
* अध्ययन ते मुल्यमापनापर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर

**ई अध्ययनाचे प्रकार :**

ई अध्ययनाचे साधारणतः चार गटात विभागणी केली जाते.

1 - Knowledge databases
2 - Inline Support
3 - Asynchronous Training
4 - Synchronous Training

1 **Knowledge databases :** हा ई-अध्ययनाचा मुलभूत प्रकार आहे. प्रत्यक्ष प्रशिक्षणाची आवश्यकता नसणाऱ्या घटकांच्या अध्ययनासाठी हा प्रकार उपयुक्त ठरतो. पायरी-पायरीने अध्ययन कसे करावे याबाबत सूचना व मार्गदर्शनाची तरतूद असते. उदा. महत्वाचा शब्द अर्थपूर्ण शब्दसमूद किंवा वाक्प्रचार टाईप केल्यास त्याबाबतची माहिती प्राप्त होते.

2 **Inline Support :** हे अध्ययन फोरम, चॅट रूम, ऑन लाईट बुलेटीन बोर्ड, ई-मेलच्या आधारे घडून येते. आंतरक्रिया अधिक चांगल्या प्रकारे घडून येतात.

3 **Asynchronous Training :** या प्रकारच्या अध्यपनामध्ये स्वयंगतीने अध्ययन करता येते. सी.डी. रॉम, इंटरनेट, इंटरनेटवर आधारित अध्ययन केले जाते. Live instructor च्या ऐवजी विविध संदर्भ साहित्यांच्या Links च्या साह्याने अध्ययन केले जाते.

4 **Synchronous Training :** यात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली थेट अध्ययन घडून येते. एकाच वेळी सर्वजन लॉग ऑन होऊन मार्गदर्शकांशी व परस्परांशी चर्चा करतात. यात इंटरनेट, वेब साईटस, व्हिडिओ कॉन्फरन्सींग, इंटरनेट टेलीफोर्निंग इ.च्या माध्यमातुन घडुन येते.

वरील चार प्रकारे ई-अध्ययन घडुन येते.

**ई-अध्ययनाची वैशिष्टये :**

१) **गतिशिलता :** अध्ययनासाठी हवी असणारी माहिती क्षणार्धात प्राप्त होते. अभ्यासक्रमाची निवड, अध्ययन, मुल्यमापन इ. बाबतीत ई-अध्ययन ही गतिमान प्रक्रिया आहे.

२) **स्थळ, काळ, वेळेची मर्यादा नसते :** यात चार भिंतींच्या आतच शिक्षण घेण्याची सक्ती नसते.

३) **अध्ययनाचे विविध स्त्रोत असतात :** अध्ययनासाठी विविध इलेक्ट्रॉनिक माध्यंमाचा वापर केल्याने विद्यार्थ्यांसमोर अध्यापनाचे विविध स्त्रोत किंवा मार्ग उपलब्ध असतात. ऑडिओ, व्हिडीओ,

ई-पुस्तके इत्यादी माध्यामातुन माहिती प्राप्त होते.

४) **स्वयंनियत्रित प्रक्रिया :** आपल अभिरूची , कौशल्य व च्मता यांना अनुरूप आवश्यकतेनुसार विद्यार्थी स्वत:च करतो व त्यावरती त्याचेच नियंत्रण असते.

५) **आशयाची विविध स्वरूपात मांडणी :** ई-अध्यनामध्ये आशय हा एक आणि एकच पध्दतीने मांडला जात नाही. विविध संदर्भग्रंथ उपलब्ध असतात. विद्यार्थ्यांना स्वंय अध्यापनास मदतधीर असा आशय असतो.

६) **स्वयंगतीने अध्ययन :** विद्यार्थी स्वत:च्या गतीने अध्ययन करीत असतो. स्वत:ला समजल्यानंतर पुढील घटकाचे अध्ययन केले जाते.

७) **सखोलतेने अध्ययन :** विविध माध्यमांच्या वापरातून जास्तीत-जास्त माहिती प्राप्त करून घटक अधिक खोलीत अभ्यासता येतो.

८) **जागतिक स्तरावरती शिक्षक विद्यार्थ्यांशी संबंध :** ई - अध्ययपनाद्वारे विद्यार्थ्यांना जगातील वेगवेगळ्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन प्राप्त होते. शिवाय विविध देशांतील विद्यार्थ्यांशी अध्ययनाद्वारे संबध येतो.

९) **वास्तव, अद्ययावत माहिती प्राप्त होते :** अध्ययनासाठी विविध स्त्रोत असल्यामुळे सतत नवीन माहिती प्राप्त होते. अद्ययावतेबरोबर माहिती ही वास्तव स्वरूपात प्राप्त होते.

१०) **भौगोलिक राजकीय मर्यादा नसतात :** ई-अध्ययनासाठी कोणत्याही प्रकारच्या भौगोलिक किंवा राजकीय मर्यादा दिसून येत नाहीत. कोणताही विद्यार्थी जगातील कोणत्याही विद्यापीठांमधुन ज्ञान प्राप्त करू शकेल.

**ई-अध्ययनासाठी वापरली जाणारी माध्यमे**

ई-अध्ययन हे विविध साधनांचा वापर करून केले जाते. या साधनांचा वापर केल्यास ई-अध्ययन अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकेल.

**विविध माध्यमांचा वापर :-**

* इंटरनेट
* वेबसाईटस्
* एज्युसॅट
* ऑन लाईन विद्यापीठे
* व्हर्च्युअल क्लासरूम

**ई–अध्ययनाचे फायदे** : (merits of E learning)

१. जागतीक पातळीवर अध्ययनाची संधी प्राप्त होते.

२. शाळेत न जाता घरी बसून निरंतर शिक्षण मिळते.

३. स्वतःच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडता येतो.

४. विस्तृत अध्ययन साहित्य उपलब्ध असते.

५. अध्ययन साहित्याची निवड करण्याचे स्वातंत्र्य असते.

६. साधनांच्या विविधतेमुळे उत्तम धारणशक्ती निर्माण होते.

७. मोठ्या विद्यार्थी संख्येचे सहजतेने व्यवस्थापन होते.

८. अध्ययनास सुसंगता प्राप्त होते.

९. विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शकांचा लाभ घेता येतो.

१०. वेगाने अद्ययावत माहिती प्राप्त होते.

११. दूरस्थ शिक्षण पध्दतीसाठी खूपच उपयुक्त ठरते.

१२. स्वयं–अध्ययन क्षमता जोपासता येते.

१३. शिक्षणाच्या सद्य–स्थितीत कमी खर्चिक आहे.

१४. On-line exam मुळे परिक्षेचा दर्जा सुधारतो.

१५. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उपयुक्त.

१६. वैयक्तिक तसेच सहकार्ययुक्त अध्ययन करता येते.

**ई–अध्ययनासाठी शिक्षकांच्या क्षमता** : (Competenies of teacher for E-learning)

१. संगणक हाताळण्याची क्षमता

२. इंटरनेट वापरण्याची क्षमता

३. अभ्यासक्रम रचना व विकसन क्षमता

४. आशयाच्या व्यवस्थापनाची क्षमता

५. प्रभावी सादरीकरण क्षमता

६. नवीन अभ्यासक्रमांची परिपूर्ण माहिती

७. विविध ऑन–लाईन विद्यापीठांची माहिती

८. प्रत्याभरण व मूल्यमापन क्षमता

**ई–अध्ययनाच्या मर्यादा :** (Demerits of E-Learning)

१. उच्च दर्जाची तांत्रिक आधारसामुग्री आवश्यक असते.

२. तज्ज्ञ शिक्षकांची आवश्यकता असते.

३. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यात भाषेमुळे मर्यादा येतात.

४. प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असते.

५. आशय सतत अद्यावत ठेवावा हे एक आवश्यक आहे.

६. उत्तम देखभाल (maintenance) आवश्यक असते.

७. समोर समोर होण्याच्या आंतक्रियांपेक्षा कमी दर्जाची आंतरक्रिया होते.

८. वेळेवर वीज उपलब्ध नसेल तर अध्ययन होणारा नाही.

९. विद्यार्थ्यांच्या अध्ययनावरती नियंत्रण ठेवण्याची मर्यादा येते.

ई–अध्ययनाच्या काही मर्यादा असल्या तरी ई–अध्ययन हे आधुनिक जगात ज्ञान प्राप्तीची गुरूकिल्ली आहे. ई–अध्ययनाचे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात खुप महत्वाचे स्थान आहे. गुणवत्तापूर्ण अध्ययन–अध्यापन होण्याच्या दृष्टीकोनातुन ई–अध्ययनास स्वीकारण्यास काहीच हरकत नाही.

**संदर्भग्रंथ :–**

१. ह.ना. जगताप (१९९५) शिक्षणातील नव प्रवाह व नव प्रवर्तने, पुणे

२. गणेश चव्हाण (२००९) अध्ययन–अध्यापन पारंपारिक ते आधुनिक–नित्यनुतन प्रकाशन, पुणे